C-15

# जाहिरात
## क्र.०१/२०२६

## जिल्हा परिषद,हिंगोली (आरोग्य विभाग)
## वैद्यकीय अधिकारी,गट-अ यांची रिक्त पदे तदर्थ/कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत

जिल्हाधिकारी,हिंगोली यांचे अध्यक्षेखाली गठीत करण्यात आलेल्या निवड समितीद्वारे आरोग्य विभाग,जिल्हा परिषद,हिंगोली यांचे आस्थापनेवरील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा (गट-अ) या संवर्गातील नियमित वैद्यकीय अधिकारी,गट-अ (एस-२०: ५६१००-१७७५००) (सातवा वेतन आयोगानुसार) या वेतन श्रेणीतील २२ (बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी यांची संभाव्य रिक्त पदे-२ व नवनिर्मित प्राथमिक आरोग्य केंद्र,बाभूळगाव ता.वसमत येथील संस्था कार्यान्वित होतांना भरावयाची रिक्त पदे-२) रिक्त पदे तदर्थ वैद्यकीय अधिकारी म्हणुन निव्वळ कंत्राटी पध्दतीने फक्त ११ महिन्याच्या कालावधीसाठी (नियमित वैद्यकीय अधिकारी/बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तेवढ्या कालावधीसाठी) एम.बी.बी.एस.(M.B.B.S.) अर्हताकामधुन तथापि, एम.बी.बी.एस. (M.B.B.S.) अर्हताधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास बी.ए.एम.एस. (B.A.M.S.) अर्हताधारकांमधुन गुणवत्तेनुसार,अनुभव व पदव्युत्तर पदवी/पदवीका शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन आणि शासन निर्णयामधील अटी व शर्तीच्या अधिन राहून पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नांव (कार्यक्रम) | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मासिक मानधन |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी,गट-अ या पदावर कंत्राटी एम.बी.बी.एस. तथापि, एम.बी.बी.एस.अर्हताधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास बी.ए.एम.एस. | २२ | एम.बी.बी.एस. तथापि, एम.बी.बी.एस.उमेदवार उपलब्ध न झाल्यास बी.ए.एम.एस. | एम.बी.बी.एस.- ७५०००/-<br>बी.ए.एम.एस.- ४००००/- |

अटी व शर्ती :-

१. महाराष्ट्र शासन,सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन परिपत्रक क्रमांक:एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४५५/कार्या-१२,दि.०९ फेब्रुवारी,२०१८ नुसार सदर पदांची नेमणूक ही पूर्णत : कंत्राटी पध्दतीची आहे. उक्त शासन आदेशान्वये सदरील रिक्त पदावरील अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय अधिकारी/कर्मचारी म्हणुन गणले जाणार नाही.

२. जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेली रिक्त पदे कमी अथवा अधिक होण्याची शक्यता असुन त्यानुसार आदेश निर्गमित करण्याचे सर्व अधिकार निवड समितीकडे राखुन आले आहे.

३. सदर तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात केवळ ११ महिन्यांसाठी किंवा सदर पदावर नियमित वैद्यकीय अधिकारी,गट-अ हे (एम.पी.एस.सी./एम.के.सी.एल./निवड मंडळ/प्रशासकीय बदलीने/विनंती बदलीने/समावेशनाने/बंधपत्रित) उपलब्ध होईल त्या दिनांकापर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तो पर्यंत राहील.

४. विहित पध्दतीने निवड झालेल्या तदर्थ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जिल्ह्यांतर्गत नेमणुका जिल्हास्तरीय समितीकडून समुपदेशानाद्वारे करण्यात येतील.

५. सदर रिक्त पदे गुणवत्ताधारक,अनुभव,पदव्युत्तर पदवी/पदवीका अर्हताधारक उमेदवारांमधून एम.बी.बी.एस. धारक शैक्षणिक अर्हता उमेदवाराची व एम.बी.बी.एस.शैक्षणिक अर्हताधारक उमेदवार न मिळाल्यास बी.ए.एम.एस.अर्हता धारकामधुन वरील पध्दतीनुसार निवड करण्यात येईल.निवडी अंती उमेदवारांची निवडसूची व गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल व सदरची गुणवत्ता यादी पुढील ११ महिने कालावधीसाठी वैध राहील. दरम्यानच्या काळात आस्थापनेवरील नियमित वैद्यकीय अधिकारी यांची पदे बदलीने/पदोन्नतीने अन्यथा इतर कारणामुळे रिक्त झाल्यास अथवा तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांचा राजीनामा व तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा समाप्त केल्यामुळे रिक्त झाल्यास त्या रिक्त होणाऱ्या पदावर क्रमशः गुणवत्तेनुसार उर्वरित उमेदवारांमधुन निवड केली जाईल.

६. सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून त्यांची नियुक्ती तदर्थ स्वरूपाची असल्यामुळे सदर पदावर कायम करण्याबाबत भविष्यात अधिकार सांगणार नाही व त्यासाठी तसेच इतर अन्य मागण्यासाठी आंदोलन/संप/बंद इत्यादी करणार नाही व त्यात भाग घेणार नाही अशा आशयाचे बंधपत्र १००/- रूपयाच्या स्टँप पेपरवर देणे अनिवार्य राहील.

७. या उमेदवारांना सेवा स्थायीकरण अथवा अन्य कोणतेही सेवा विषयक लाभ मिळणार नाहीत. सदर नियुक्ती करारपध्दतीने ११ महिन्याकरीता करण्यात येईल. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०९.०२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रा प्रमाणे कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांच्यासोबत करारनामा करण्यात येईल.

८. अंतीम गुणवत्ता यादीमधुन प्रत्यक्ष समुपदेशनासाठी १:३ या प्रमाणात उमेदवारांना बोलविण्यात येईल.

९. प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर विशेषज्ञाच्या विशेष सेवा घेतल्या जात नाहीत. त्यामुळे पदव्युत्तर पदवी/पदवीका धारकास वाढीव मानधना ऐवजी एम.बी.बी.एस.अर्हताधारक उमेदवारांना अनुज्ञेय होणारे मासीक मानधन रूपये ७५०००/- (अक्षरी - पंच्याहत्तर हजार रूपये केवळ/-) अनुज्ञेय राहील.

१०. निवड झालेल्या तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांना मुख्यालयी वास्तव्य करून राहणे बंधनकारक राहील. तसेच त्यांना फेसरिडिंग बायोमेट्रीक ऑनलाईन प्रणालीद्वारे दैनंदिन उपस्थिती नोंदवणे अनिवार्य राहील.व त्या आधारे मासीक मानधन अदा केले जाईल.

११. सदर भरती मधील रिक्त पदे कमी -अधिक करण्याचा तसेच सदरील भरतीबाबत सर्व निर्णय घेण्याचे अधिकार निवड समितीकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत. तसेच भरतीच्या पुढील कालावधीत बदली/सेवानिवृत्ती/राजीनामा/अनधिकृत गैरहजेरीमुळे होणाऱ्या रिक्त पदांकरिता शासन निर्णय क्रमांक:मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१/सेवा-३,दि.०२ मार्च,२०१५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जिल्हास्तरावर दर महिन्याच्या १ तारखेला व १५ तारखेला (या दिवशी सुट्टी असल्यास त्याच्या दुसऱ्या दिवशी) ही पदभरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

१२. अनुभव प्रमाणपत्रा सोबत नियुक्ती आदेशांच्या प्रती जोडणे अनिवार्य राहील.

१३. सदर पदभरतीच्या अनुषंगाने पात्र उमेदवारांनी आपला अर्ज व सर्व आवश्यक कागदपत्राच्या छायांकित प्रति स्वसाक्षांकित करून अर्ज जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद,हिंगोली कार्यालय,हिंगोली येथे प्रत्यक्ष सादर करावे.

१४. अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

१५. तदर्थ वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा खालील कारणास्तव समाधानकारक नसल्यास कोणत्याही क्षणी त्यांची कंत्राटी सेवा पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येतील व त्यांना पुन्हा नियुक्ती देण्यात येणार नाही:-

- i) दोन दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी विनापरवानगी गैरहजर,
- ii) कामामध्ये निष्काळजीपणा,
- iii) बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी न लावणे,
- iv) कामकाज अकार्यक्षम असणे/सेवेची कर्तव्ये व जबाबदाऱ्या कटाक्षाने न पाळल्यास,
- v) गैरवर्तन/गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास येणे,
- vi) कार्यरत पदावर नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती झाल्यास,

१६. खालील कारणास्तव कार्यमुक्त झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्ती मिळणार नाही :-

- i) कंत्राटी म्हणुन नियुक्ती मिळाल्यानंतर कालावधी पूर्ण होण्यापूर्वी परवानगी न घेता गैरहजर असलेले व सोडून गेलेले वैद्यकीय अधिकारी
- ii) शासन सेवेत ५८ वर्ष सेवा पूर्ण करून सेवानिवृत्त झालेले वैद्यकीय अधिकारी
- iii) शिस्तभंगाच्या कारणास्तव सेवा समाप्त केलेले वैद्यकीय अधिकारी
- iv) अनधिकृत गैरहजर असलेले व शासन सेवेतून काढून टाकलेले व संपामध्ये प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभागी झालेले वैद्यकीय अधिकारी
- v) वरील (i) ते (iv) कारणामुळे सेवा समाप्त झाली नाही या आशयाचे शपथपत्र साध्या कागदावर देणे बंधनकारक राहील.

१७. तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांना नियमित अधिकारी/कर्मचाऱ्यांप्रमाणे खालील कोणतेही फायदे मिळविण्यास ते पात्र असणार नाहीत:-

१७. तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांना नियमित अधिकारी/कर्मचाऱ्यांप्रमाणे खालील कोणतेही फायदे मिळविण्यास ते पात्र असणार नाहीत:-

i. सदर तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण),नियम १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व तद्अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू राहणार नाहीत. तसेच त्यांना म.ना.से.(रजा) १९८१ चे नियम लागू राहणार नाहीत व गट विमा योजना, अथवा तत्सम कोणतेही सेवा विषयक इतर लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत.

ii. सदर तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही.

iii. या पदावरील अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

iv. तदर्थ स्वरूपात सेवा असल्याने संबंधित पदावर कायम करण्याचा अधिकार त्यांना सांगता येणार नाही, तसेच त्या अनुषंगाने कोणत्याही मा.न्यायालयात जाता येणार नाही. अशा आशयाचा करारनामा करून देणे अनिवार्य राहील.

v. सदर तदर्थ नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना सदर पदावर कायम करण्यात येणार नाही व त्या पदावर त्यांचा धारणाधिकार असणार नाही.

vi. तदर्थ पद्धतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची भविष्यात विहित मार्गाने नियमित पदावर नियुक्ती झाल्यास सदरची तात्पुरती सेवा त्यांच्या नियमित सेवेस जोडून दिली जाणार नाही.

vii. सदर नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात असल्याने नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची तदर्थ सेवा अर्हताकारी सेवा म्हणुन गणण्यात येणार नाही किंवा त्यांना सेवा जेष्ठता व अन्य कोणत्याही प्रकारच्या सेवाविषयक बाबींसाठी ग्राह्य धरली जाणार नाही.

viii. केवळ तात्पुरती व तदर्थ नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची, ही सेवा म.ना.से. (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ मधील नियम ३० नुसार अर्हताकारी सेवा म्हणून गणण्यात येणार नाही किंवा सेवाज्येष्ठता व अन्य कोणत्याही प्रकारच्या सेवाविषयक बाबींसाठी ग्राह्य धरली जाणार नाही.

१८. इतर अटी व शर्ती :-

i. नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध झाल्यानंतर अथवा अन्य प्रयोजनार्थ वैद्यकीय अधिकारी पद रिक्त करावयाचे झाल्यास तदर्थ पध्दतीने नियुक्ती केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा समाप्त करतांना जो वैद्यकीय अधिकारी शेवटी रूजु झालेला आहे. त्याची सेवा प्रथम समाप्त करण्यात येईल.

ii. निवड झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मुख्यालयी राहणे बंधनकारक असेल,तसेच बायोमेट्रक हजेरीप्रणालीवर हजेरी लावणे अनिवार्य राहील.त्या आधारेच मासिक मानधन अदा करण्यात येईल.

iii. सदर तदर्थ वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवा काळात सेवामुक्त व्हायचे असल्यास त्यांना एक महिन्याची नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन भरून कार्यमुक्त होता येईल.

iv. सदर पदांची नेमणूक ही पूर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल.

v. **नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यास तेथील कंत्राटी उमेदवाराची सेवा समाप्त करण्यापूर्वी त्यांना जिल्ह्यातील अन्य रिक्त पदी कंत्राटी नियुक्ती देण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती विचार करेल.**

vi. सदर तदर्थ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या,नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त असलेल्या पदी तसेच अनधिकृत गैरहजर असणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यामुळे रिक्त राहणाऱ्या पदीही करता येतील.

vii. सदर तदर्थ वैद्यकीय अधिकाऱ्याना म.ना.से. (वर्तणूक) नियन १९७९ मधील तरतुदी लागू होतील.

viii. आरोग्य विभाग,जिल्हा परिषद,हिंगोली यांचे आस्थापनेवरील सदरील सर्व रिक्त पदे ही बिगर आदिवासी व दुर्गम कार्यक्षेत्राबाहेरील आहेत.

ix. संचालक,आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई यांचे बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी यांच्या ऑनलाईन नियुक्ती संदर्भातील संगणक प्रणाली मध्ये आरोग्य सेवा अंतर्गत विविध स्तरावर करावयाच्या मार्गदर्शक सूचना दि.२३.०६.२०२२ नुसार सदरील रिक्त पदे दर महिन्याच्या शेवटच्या तारखेस (३०/३१) dmerbond.org या संगणक प्रणालीवर ऑनलाईन पद्धतीने बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी,गट-अ यांचे मार्फत भरण्याकरिता रिक्त दर्शविण्यात येतील. dmerbond.org या प्रणालीवरून बंधपत्रित उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना कार्यमुक्त करण्यात येईल.

x. सदर भरती मधील रिक्त पदे भरण्याबाबत,जाहिराती मधील अटी वगळणे,नव्याने अटी अंतर्भूत करणे ई. सर्व निर्णय घेण्याचे अधिकार निवड समितीकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

xi. उमेदवाराने अर्जामध्ये खोटी,चूकीची माहिती दर्शविल्याचे भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर निदर्शनास आल्यास उमेदवाराची उमेदवारी तात्काळ रद्द करून त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१९. निवड पध्दती/निकष :-

१. मुलाखतीमध्ये उमेदवाराच्या निवडीमध्ये व्यक्तिनिष्ठता येऊ नये यासाठी मुलाखत न घेता गुणवत्ता ,अनुभव, पदव्युत्तर पदवी/पदवीका अर्हता विचारात घेऊन त्यास खालील प्रमाणे गुणदान राहील व त्या आधारे उमेदवारांची निवड व प्रतिक्षासूची करण्यात येईल.

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता व अनुभव | गुणांचे प्रमाण | शेरा |
|---|---|---|---|
| १. | M.B.B.S./B.A.M.S. अंतीम वर्षाचे गुण | ४०% (जास्तीत जास्त ४० गुण) | |
| २. | पदव्युत्तर पदवी/पदवीका (PG) अंतीम वर्षाचे गुण | ४०% (जास्तीत जास्त ४० गुण) | |
| ३. | अनुभव (शासकीय/बंधपत्रित/एन.एच.एम.) | प्रत्येक वर्षाला २ गुण (जास्तीत जास्त २० गुण) | |
| | एकुण गुण | १०० | |

१. उमेदवारांनी अर्ज सादर करण्याची मुदत :- दि.१४/०७/२०२६ ते दि.२६/०७/२०२६ राहील.
२. दि. /०७/२०२६ नंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
३. प्राप्त अर्जाची समिती मार्फत छाननी :- दि. २८/०७/२०२६ ते दि.३१/०७/२०२६
४. तात्पुरती पात्र व अपात्र यादी प्रसिध्द करणे :- दि. ४/०८/२०२६
५. उमेदवारांनी पात्र/अपात्र यादीवर आक्षेप नोंदविण्याची मुदत :- दि. ४/०८/२०२६ ते दि. ८/०८/२०२६
६. दि. ८/०८/२०२६ नंतर प्राप्त होणारे आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.
७. अंतीम पात्र,अपात्र यादी प्रसिध्द करणे :- दि. १२/०८/२०२६
८. अंतीम गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे :- दि. १६/०८/२०२६
९. समुपदेशनासाठी पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे :- दि. १८/०८/२०२६
१०. प्रत्यक्ष समुपदेशन :- दि.२१/०८/२०२६

सदर पदभरतीची जाहिरात व इतर प्रसिध्दीपत्रक www.hingoli.nic.in व www.zphingoli.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

टिप- उक्त पदभरती दिनांकामध्ये अथवा ठिकाणामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव बदल झाल्यास तसे www.hingoli.nic.in व www.zphingoli.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्दीपत्रकाद्वारे प्रसिध्द करण्यात येईल.

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद,हिंगोली

सदस्य
जिल्हा निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,हिंगोली

अध्यक्ष
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी ,हिंगोली

जाहिरात क्रं.१/२०२६
जिल्हा निवड समिती हिंगोली
(आरोग्य विभाग जिल्हा परिषद हिंगोली)
कंत्राटी पध्दतीने तदर्थ वैदयकीय अधिकारी पदासाठी अर्जाचा नमुना

| उमेदवाराचा फोटो व स्वाक्षरी |
|---|

प्रति,

अध्यक्ष/सचिव
जिल्हा निवड,समिती हिंगोली.

| | | |
|---|---|---|
| १. | अर्जदाराचे संपुर्ण नाव (मराठी मध्ये ) | |
| | इंग्रजी मध्ये (कॅपीटल) | |
| २. | वडीलांचे नाव/पतीचे नाव (मराठी मध्ये ) | |
| | इंग्रजी मध्ये (कॅपीटल) | |
| ३. | जन्म तारीख व जाहिरातीच्या दिवशीचे वय | जन्म दिनांक :-<br>वय-------- वर्षे----- महिने----- दिवस |
| ४. | लिंग स्त्री/पुरुष | |
| ५. | मोबाईल नंबर (DND ॲक्टीव नसावा)/व ईमेल आय.डी. | |
| ६. | संपुर्ण पत्ता :- मुळ पत्ता (पिन कोडसह)<br>सध्याचा पत्ता (पिन कोडसह)<br>(Email/पत्ता टाकणे बंधन कारकआहे) | |
| ७. | जाहिरातीनुसार मुळ शैक्षणिक पात्रता | |
| ८. | MBBS,BAMS अंतिम वर्षाचे गुण | |
| ९. | इतर शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवी/पदविका) अंतिम वर्षाचे गुण | |

१०.

| अ.क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नाव | पद | एकुण कालावधी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २ | | | | |
| | ३ | | | | |
| | ४ | | | | |
| ११. | नोंदणी प्रमाणपत्र/कौन्सील प्रमाणपत्र क्र. व दिनांक अंतिम नोंदणी प्रमाणपत्र मुदतीत असावे. | | | | |

व नमुद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचुक आहे.मी प्रमाणित करतो/करते की,वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळुन आल्यास सदरील तदर्थ वैदयकीय अधिकारी गट अ पदावरील नियुक्तीस अनर्ह ठरेल व होणा-या कायदेशीर कारवाईस पात्र राहील.खालील प्रमाणपत्रे साक्षांकित करुन अर्जासोबत जोडलेल्या आहेत

१.जन्म तारखेला दाखला /१०वी पास प्रमाणपत्र, सोबत जोडले आहे. होय/नाही

२.एम.बी.बी.एस/बी.ए.एम.एस.उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, पदवीचे नाव व गुणपत्रिका, सोबत जोडले आहे. होय/ नाही

३.पदव्युत्तर पदवी/पदविका प्रमाणपत्र व गुणपत्रिका (असल्यास), सोबत जोडले आहे. होय/नाही

४.महाराष्ट्र वैदयकीय परिषदेचे (Maharashtra Medical Council)/महाराष्ट्र भारतीय चिकित्सा परिषद (Maharashtra Medical Council) यांचे कायम नोंदणी व नुतणीकरण केल्याचे प्रमाणपत्र (एम.एम.सी)–होय/नाही.

५.आंतरवासियता प्रमाणपत्र, सोबत जोडले आहे. होय/नाही

६.अनुभव दाखला प्रमाणपत्र असलयास, सोबत जोडले आहे. होय/नाही

७.अॅटेम्प्ट सर्टिफिकेट, सोबत जोडले आहे. होय/नाही

८.अनुभव प्रमाणपत्राच्या अनुंषगाने नियुक्ती आदेशाच्या प्रति, सोबत जोडले आहे.होय/नाही

अर्जदाराची स्वाक्षरी

पत्ता :--

# वचनपत्र

मी----------------------------------------------------------------- वय--------- रा.---------------- --------- असे प्रतिज्ञापुर्वक लिहून देतो की, १. माझी यापुर्वी कंत्राटी वैदयकी अधिकारी पदावर नियुक्ती मिळाल्यानंतर नियुक्तीचा कालावधी पुर्ण होण्यापुर्वी मी पुर्व परवानगी न घेता गेरहजर या पुर्वीच्या सेवेत राहीलेला/राहीलेली नाही. २. माझी यापुर्वीच्या सेवेत कार्यरत असताना शिस्तभंगाच्या कारणास्तव सेवा समाप्त केलेली नाही.३.मी या पुर्वी सेवेमध्ये असतांना अनाधिकृत गैरहजर राहीलेला/राहीलेले नाही व त्यामुळे मला शासन सेवेतुन काढून टाकलेले नाही. ४.मी या पुर्वी सेवेत असतांना मी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संपात सहभागी झालो/झालेली नाही.तसेच जाहिरातीमधील सर्व अटी व शती मला मान्य आहेत.

अर्जदाराची स्वाक्षरी

पत्ता :--

ई-मेल:-